
# व्यक्ती-वल्ली - कॅमेरामन पांडुरंग नाईक: भाग १

'शिवाजी पार्कच्या कट्ट्यावरून' हा माझा लेख वाचल्यावर माझा मित्र अजित नाईक याने कळविले, *"अरे जयु, तू 'पांडुरंग नाईक मार्ग' कसा विसरलास..?"* मी विसरलो-बिसरलो नव्हतो परंतु, कां नाही लिहिलं याचा त्याला समाधानी खुलासा केला. सुप्रसिद्ध कॅमेरामन पांडुरंग नाईक हे अजितचे वडील होत. ते ज्या रस्त्यावर म्हणजे, शिवाजी पार्क रोड नंबर ५ वर राहात होते, (कॅडेल रोड व शिवाजीपार्क रोड नंबर पांचच्या कोपऱ्यावरील 'भागीरथी सदन' बिल्डिंग) त्याला सुमारे चाळीस वर्षांपूर्वी सन्मानपूर्वक त्यांचं नांव दिलं आहे. खरं म्हटलं तर, मी त्यांच्यावर केव्हाच लेख लिहायला घेतला होता. तसेच, पुण्यात २०१२ मध्ये भरलेल्या 100 Years of Indian Cinemaच्या अविस्मरणीय सोहळ्यातील माझ्याकडील दुर्मिळ छायाचित्रांच्या प्रदर्शनात पांडुरंग नाईक यांचे दुर्मिळ फोटो प्रयत्न करूनही मिळाले नव्हते. म्हणून मी त्यांचा प्रदर्शनात समावेश करू शकलो नव्हतो याची खंत होती. परंतु, उशिरा कां होईना, त्याला आज मुहूर्त लागला. असो.



*१) कॅमेरामन पांडुरंग नाईक... २) 'हंस पिक्चरची त्रिमूर्ती': मास्टर विनायक, बाबुराव पेंढारकर व पांडुरंग नाईक... ३) १९४४च्या 'रामशात्री' मध्ये गजानन जहागीरदार...*

तसं पाहिलं तर, त्या रोड नंबर पांचवर अनेक दिग्गज व नामवंत व्यक्ती रहात होत्या. त्या म्हणजे, माझा मित्र अजय याचे आई-वडील व सुरुवातीपासून म्हणजे,

कलकत्त्यापासून मुंबईपर्यंत HMVचे चीफ रेकॉर्डिंग इंजिनियर नामवंत माधवराव माडगावकर व त्यांच्या भावगीत गायिका पत्नी सुधाताई (सबनीस), त्याचप्रमाणे, त्यांच्या बिल्डिंगमध्ये रहाणारे ज्येष्ठ संगीतकार व कळसूत्री बाहुल्यांचे निर्माते माधवलाल दामोदर मास्टर आणि त्याच्या मागच्या बाजूला रहाणारे, एकेकाळी रणजित स्टुडिओच्या गाजलेल्या चित्रपटांचे श्रेष्ठ संगीतकार बुलो सी. रानी. तसेच, त्या गल्लीत सुप्रसिद्ध व्हायोलिन वादक व शास्त्रीय संगीताचे अंध गायक पं. विजयकुमार संझगिरी (पंडितजी अजूनही तेथे रहातात) आणि प्रसिद्ध वैद्यकीय डॉक्टर, सेक्सॉलॉजिस्ट, साहित्यिक, व लेखक विठ्ठल प्रभुही रहात होते. थोडक्यात, ऐतिहासिक शिवाजी पार्कच्या पांचही गल्ल्यांमधून वैभवशाली व नामवंत व्यती रहात होत्या. हे अभिमानास्पद व भूषणावह होतं. अमेरिकेत राहून माझ्या आई-वडिलांच्या कृपेने, त्या वैभवशाली शिवाजी पार्कचा सचित्र इतिहास मी लिहून व जपून ठेवण्याचा प्रयत्न करीतही आहे. याचा मला आनंद होतोय...

पांडुरंग नाईक यांचा जन्म १३ डिसेंबर, १८९९ मध्ये गोव्यातील लहान गांवात म्हार्दोळ येथे झाला होता. लहान वयातच त्यांना फोटग्राफीची आवड निर्माण झाली होती. परंतु, त्या गांवात जे दोन फोटोग्राफर होते ते आपले शिक्षक असं समजून त्यांच्याकडे पडेल ते काम ते करीत असत. त्यातून त्यांची कौटुंबिक परिस्थती खास नव्हती. या गरिबीतूनच त्यांना चित्रकलेचीही आवड निर्माण झाली होती. दुर्दैवाने वडील लवकर गेल्याने त्यांचा तरुण वयात स्वप्नभंग झाला व आवडत्या गोष्टींचा त्यांना त्याग करावा लागला होता. अशा द्विधा मनःस्थितीत असतांना अचानक स्थानिक वृत्तपत्रात एका फिल्म कंपनीत काम करणारा माणूस हवाय अशी छोटेखानी जाहिरात वाचली. ती जाहिरात होती, चित्रपट सृष्टीचे प्रवर्तक दादासाहेब फाळके यांच्या नाशिक येथील स्टुडिओतली. कांहीही न विचार करतां आपलं घर सोडून त्यांनी थेट नाशिक गाठलं. परंतु, फिल्म क्षेत्रात कसलाही अनुभव व दाखले नसल्याने नाईक यांना फाळके यांनी चक्क नकार दिला होता. महत्वाकांक्षी नाईक यांचा अपेक्षाभंग झाला होता. तरीही निराश न होता त्यांनी त्याच कंपनीत जरीवाला ज्यांना भैया म्हणत त्याचेकडे काम करू लागले. कलात्मक

वृत्तीचे नाईक हे कागदाचे विविध प्रकारची कल्पक फुले बनवीत असत. हे पाहून जरीवाला भैया अत्यंत खूष झाले व त्या कागदी फुलांसह त्यांनी नाईक यांची पुनः फाळके यांबरोबर भेट घडवून आणली. आणि त्याचक्षणी चमत्कार घडला. दादासाहेब फाळके यांनी नाईक यांना सहा महिने कामावर ठेवले. या दरम्यान संधीचा योग्य फायदा घेऊन नाईक यांनी मेहनतीने फिल्म कॅमेराचं तंत्र, मेकअप, सुतारकाम, सेट डेकोरेशन व अभिनयही शिकून घेतला. फिल्म कॅमेराचं तंत्र, मेकअप, सुतारकाम, सेट डेकोरेशन व अभिनयही शिकून घेतला. थोडक्यात, सिनेमा क्षेत्रात लागणारं सर्व कांही तंत्र आत्मसात केलं. फोटोग्राफीमध्ये त्यावेळी सुविधा उपलब्ध नसल्याने प्रकाश योजनेत निरनिराळे वैचारिक व तांत्रिक प्रयोग त्यांनी केले व स्वतःच्या हुशारीवर त्यात त्यांनी उल्लेखनीय प्रगती केली होती. यावेळी त्यांच्या गांवाजवळ राहणाऱ्या मास्टर दीनानाथ मंगेशकरांशी ओळख झाली होती...




*१) १९३४च्या 'इंदिरा एम. ए.' मध्ये सुलोचना... २) १९३७च्या 'छाया'त लीला चिटणीस व मा. विनायक... ३) १९३८च्या 'ब्रह्मचारी' मध्ये मा. विनायक व मीनाक्षी शिरोडकर...*

१९१७ मध्ये त्यांनी नाशिकहून मुंबईत स्थलांतर केलं. आणि पाटणकर फ्रेंड्स फिल्म कंपनीत काम केलं. तेथून कोहिनूर फिल्म कंपनीत जाऊन तेथे असिस्टंट कॅमेरामन म्हणून त्यांनी पांच वर्ष काम केलं. यावेळी सुप्रसिद्ध व्ही. बी. जोशी, दत्तात्रय दाबके आणि गजानन देवारे यांच्या हाताखाली काम करण्याचा उपयुक्त अनुभवाव मिळाला होता. नंतर १९२६ साली नाईक यांना 'नीरा' नांवाची पहिली मूक चित्रपट करण्याची

संधी मिळाली. मग त्यांना कधीच मागे वळून पहावं लागलं नाही. पुढे १९२९ साली जगदीश स्टुडिओतील शेठ चंदुलाल शहा व गोहरबाई यांनी स्थापन केलेल्या रणजित स्टुडिओत ते काम करू लागले. यावेळी त्यांचे प्रकाशित झालेले सिनेमे होते, १९२९चे 'चंद्रमुखी' व 'पती पत्नी', १९३१ मधील 'देवी देवयानी', १९३२ चा 'सती सावित्री', १९३३ मधील 'विश्वमोहिनी' व 'मिस १९३३'. त्यांचा रणजितचा शेवटचा सिनेमा होता, 'गुणसुंदरी'. रणजितमध्ये काम करीत असतांना नाईक यांनी हॉलिवूडचे सिनेमे पाहून कॅमेरा व प्रकाश योजनेमधी अनेक तांत्रिक योजनेचा अभ्यास करून त्याचा वापर करण्याचे प्रयत्न केले होते. सिनेमा क्षेत्रातील हे त्यांनी केलेले सर्वप्रथम यशस्वी प्रयोग समजले जातात. याचवेळी चंदुलाल शहा Dr. Jekyll and Mr. Hyde हा Frederic Marchचा चित्रपट पाहून त्यातील झोपाळ्याचा 3D effect पाहून प्रभावित झाले होते. तो झोपाळ्याचा 3D effect चंदुलाल शहा यांना त्यांच्या १९२९ मधील 'चंद्रमुखी' या सिनेमात हवा होता. तेव्हा त्यांनी नाईक यांना तशी विनंती केली. हे अवघड आवाहन स्विकारून नाईक यांनी युक्ती लढवली. एका लाकडाच्या फलकावर कॅमेरा फिक्स केला व दोरींनी तो फलक वरच्या छताला बांधला व झोपाळ्याप्रमाणे हलविण्यात आला. आणि काय आश्चर्य, अगदी हुबेहूब 3D effect मिळाला व चित्रीकरण अपेक्षेपेक्षा प्रभावी झालं होतं. मात्र, त्यावेळी चित्रपट क्षेत्रात काम करणाऱ्यांना हे कसं केलं याचं कोडं पडलं होतं. त्यांना वाटलं होतं मोठी क्रेन वापरून केलं असावं... असो. १९३३ मध्ये त्यांनी रणजित स्टुडिओला रामराम करून इंपिरियल स्टुडिओला काम सुरु केलं. तेथे त्यांनी सुप्रसिद्ध अभिनेत्री सुलोचनाने (रुबी मायर्स) काम केलेला १९३४ मधील 'इंदिरा एम. ए.' हा चित्रपट केला होता. इतर व तांत्रिक दृष्ट्या नाईक यांच्या मते हा चित्रपट हॉलिवूडच्या धर्तीवर झाला होता.




*१) १९२९चा 'चंद्रमुखी'... २) १९६२चा 'आरती'... ३) १९५९चा 'चिराग कहाँ रोशनी कहाँ'... ४) १९६१ मधील 'प्यार का सागर'...*

शूटिंग करतांना बाहेरच्या नैसर्गिक सूर्यप्रकाशामुळे व आतील कृत्रिम दिव्यांच्या प्रकाशामुळे होणाऱ्या तांत्रिक परिणामाचा होणारा दुष्परिणाम टाळण्यासाठी नाईक यांनी बाहेरील सूर्यप्रकाश पूर्ण बंद करून कृत्रिम दिव्यांच्या प्रकाशाचा सदुपयोग केला होता. उत्तम छायाचित्रणासाठी हा प्रयोग पूर्ण यशस्वी झाला होता. तसेच, फोटोग्राफीमधील side lighting, top lighting आणि light & shadeच्या यशस्वी तंत्राचा शोध सर्वप्रथम नाईक यांच्या नांवावर जातो. हे कौतुकास्पद आहे.
१९३३ साली दिग्दर्शक नंदलाल जसवंतलाला व रेकॉर्डिस्ट जमीनदास सुभेदार यांचेसह नाईक संपूर्ण चित्रपट सृष्टीचा अभ्यास करण्यासाठी युरोपचा दौरा करून आले होते. तेथून परतल्यावर त्यांनी कोल्हापूरला जाऊन सुप्रसिद्ध मास्टर विनायक व बाबुराव पेंढारकर यांच्या सहयोगाने ‘हंस पिक्चर्स'ची स्थापना केली होती. हंसने प्रकाशित केलेले व गाजलेले सर्व सिनेमे नाईक यांनी चित्रित केले होते. ते होते, १९३८ चा ‘ब्रह्मचारी', १९३९चा 'ब्रान्डीची बाटली', १९३७चा 'धरमवीर' आणि १९३७चा 'छाया'. पुढे 'हंस पिक्चर्स' बंद पडल्यावर त्यांनी 'प्रभात फिल्म' कंपनीसाठी अत्यंत यशस्वी दोन सिनेमे चित्रीत केले होते. ते म्हणजे, १९४४चा ‘रामशास्त्री' व १९४५चा ‘लाख रानी'. नंतरची कांही वर्ष दर्जेदार कामाचा अनुभव ख्याती असणाऱ्या नाईक यांनी फेमस स्टुडिओचे विख्यात बाबुराव पै, दिग्दर्शक विश्राम बेडेकर, सुप्रसिद्ध सिनेनट

गोप, नामवंत दिग्दर्शक-निर्माता के. अमरनाथ व १९५९ चा देवेंद्र गोयल यांचा 'चिराग कहाँ रोशनी कहाँ' चित्रित केला होता. तत्पूर्वी, फणी मुजुमदार यांचा १९६२चा 'आरती' आणि डी. डी. कश्यप यांचा १९५१ मधील ‘आराम'. आणि १९५१चा 'दो सितारे'. १९३८चा ‘ज्वाला', १९४०चा 'अर्धांगिनी', १९४०चा 'लपंडाव', १९४२चा 'भक्त दामाजी', १९४२चा 'पहिला पाळणा', ९१४१चा 'पगडी' व 'अमृत'. तसेच, १९३१मध्ये त्यांनी ‘मार्तण्ड वर्ण’ हा मल्याळी चित्रपटही केला होता. पांडुरंग नाईक यांच्या अनुभवांचा व कार्याचा प्रभाव नंतरच्या काळात सुरेंद्र पै, सजू नाईक, अनंत कदम, जमशेद इराणी आणि व्ही. बलसारा याचेवर पडला होता. १९५९च्या 'चिराग कहाँ रोशनी कहाँ' या चित्रपटाच्या वेळी नाईक यांना अपघात झाल्याने त्यांनी सिनेक्षेत्रातून निवृत्ती पत्करली होती. त्यांचे सहाय्यक श्रीधर नाईक व रत्नाकर लाड यांनी तो चित्रपट पूर्ण केला होता. प्रसिद्धीविन्मुख, शांत स्वभावाचे नम्र व विनयशील नाईक यांना अनेकांनी त्यांच्या आत्मचरित्रासाठी अथवा पुस्तकासाठी विनवणी केली गेली होती. परंतु, त्यांनी ती फेटाळून लावली होती. अत्यंत कष्टमय जीवनातून अनेक अडथळे पार करून जिद्दीने आपल्या आवडत्या क्षेत्रात गौरवास्पद, अखंडपणे व यशस्वीपणे कार्यान्वित राहणाऱ्या आदरणीय पांडुरंग नाईक यांची दीर्घ आजारानंतर १९७६ साली जीवनजोत मावळली...

**जयंत विठ्ठल कुळकर्णी.**

ता. क. सांगायला अभिमान वाटतो की, त्यांचा मुलगा व माझा बालमोहन शाळेतील मित्र अजित नाईक हा पण आपल्या बडिलांप्रमाणे परंतु, हल्लीच्या नवं तंत्रातील क्षेत्रात प्रसिद्ध व नामांकित इलेक्ट्रॉनिक कॅमेरामन असून त्याने लहान मुलांसाठी 'विक्रम आणि वेताळ' या टीव्ही सिरीज केल्या. तसेच, अनेक कार्यक्रमाबरोबर बी. आर. आणि रवी चोप्रा यांची सुप्रसिद्ध 'रामायण' ही गाजलेली सिरीजही केली होती.

## कॅमेरामन पांडुरंग नाईक: भाग २

नमस्कार,
सुप्रसिद्ध कॅमेरामन पांडुरंग नाईक यांच्यावर लिहिलेल्या माझ्या लेखाला उत्तम प्रतिसाद मिळाला. तो नाईक यांना दिलेला मानाचा मुजरा होता.तसेच, त्यांच्या मुलानी म्हणजे, प्रसिद्ध कॅमेरामन व माझा मित्र अजित नाईक, जो electronic cinematographyमध्ये नामांकित आहे, यानी नुकतेच आपल्या वडिलांचे कांही दुर्मिळ फोटो पाठवले. त्याबद्दल अजितचा मी मनापासून आभारी आहे. हे सर्व ऐतिहासिक असून माझी ९ वर्षाची प्रतीक्षा अथवा तपश्चर्या फलद्रुप झाली. आणि माझा आनंद द्विगुणीत झाला. तोच आनंद तुम्हालाही देत आहे. खाली दिलेले ते फोटो पाहावेत. असो. आपण तब्बेतीला जपून रहावे व काळजी घ्यावी. धन्यवाद.
आपला,
जयंत.

*सर्व फोटो अजित नाईक याच्या सौजन्याने...*



*१-२-४) रुबाबदार, नम्र व साध्या व्यक्तिमत्वाचे सुप्रसिद्ध कॅमेरामन पांडुरंग नाईक. ३) हा फोटो १९३६ मध्ये लाहोरच्या एका इंग्रजी सिने-स्मरणिकेत प्रकाशित झालेला होता. त्यात अशी माहिती होती: Pandurang Naik is one of the best cameramen in India. He gained recognition with Ranjit and proceeded to Europe with Nandlal Jaswant Lall and*

*late Jamnadas Subhedar. After his return from the continental tour he joined Imperial Film Company and stayed thre till release of film Pujarin. Left Imperial to join Huns Pictures as Cameraman and one of the partners early in 1936.*



*१) दादासाहेब फाळके यांच्यासोबत कॅमेरामन पांडुरंग नाईक... २-३) चित्रीकरणाच्या वेळी कॅमेरामन पांडुरंग नाईक...*




*१) १९८७ मधील गाजलेल्या सुप्रसिद्ध 'रामायण' टी व्ही मालिका चित्रित केलेला, डावीकडून तिसरा electronic cinematographer अजित नाईक... २) 'रामायण' मालिकेतील दृश्य एक... ३) कॅमेरामन अजित नाईकने चित्रित केलेली १९८५ मधील लहान मुलांची गाजलेली टी व्ही मालिका 'विक्रम आणि वेताळ'...*

---